E/Sujay/ circular Marathi/ PA

# मुंबई विद्यापीठ

क्र.संलग्नता/आयसीसी/(२०२५—२६)/२७/२०२५

## परिपत्रक:

मुंबई विद्यापीठ संलग्नित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक, विद्यापीठाच्या विविध विभागाचे संचालक/प्रमुख तसेच विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे, कल्याण व सिंधुदुर्ग उपपरिसराचे संचालक/समन्वयक यांना कळविण्यात येते की, जे अभ्यासक्रम अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) व इतर व्यवसायिक मान्यता प्राप्त मंडळ/परिषदा (BCI, COA, PCI & NCTE etc) यांच्या अंतर्गत येणारे अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी तसेच या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी प्रवेश संख्येत वाढ/घट करण्यासाठी पालक विद्यापीठाकडील **"ना हरकत प्रमाणपत्र"** सादर करावे लागत असते. तरी ज्या महाविद्यालयांना असे नविन अभ्यासक्रम, नविन विद्याशाखा सुरू करावयाचे आहेत तसेच अभ्यासक्रमाच्या नावात बदल व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी प्रवेश संख्येत वाढ/घट करावयाची इत्यादी करीता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी विद्यापीठाकडे मागणी पत्र सादर करावे. मागणी पत्र विद्यापीठाकडे प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठ सदर मागणी विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणा पुढे सादर करून प्राधिकरणांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठाकडून **"ना हरकत प्रमाणपत्र"** संबंधित महाविद्यालयांना देण्यात येईल.

तरी ज्या महाविद्यालयांना/संस्थांना नविन अभ्यासक्रम, नविन विद्याशाखा, अभ्यासक्रमाच्या नावात बदल आणि अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी प्रवेश संख्येत वाढ/घट करावयाची आहे अशा महाविद्यालयांनी **दिनांक १२ नोव्हेंबर, २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग, कक्ष क्र. २०७, दुसरा मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२ येथे प्रस्ताव सादर करावे.** सदर नमूद केलेल्या दिनांक व वेळेनंतर येणारे प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत.

याची कृपया नोंद घ्यावी.

मुंबई—४०० ०३२
०३ नोव्हेंबर, २०२५

(डॉ. प्रसाद कारंडे)
कुलसचिव

प्रत:—

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना.